

# मेट्रो ३ चे भुयारीकरण १०० टक्के पूर्ण

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील मुंबई सेंट्रल स्थानकावर बुधवारी ४२ वा व प्रकल्पातील अंतिम भुयारीकरणाचा टप्पा पार पडला. अपलाइन मार्गावरील या भुयारीकरणास एकूण ४३ दिवसांचा कालावधी लागला. मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकापर्यंतची ८३७ मीटर आव्हानात्मक भुयारीकरणाचे काम रॉबिन्सच्या टीबीएम तानसा-१ ने पूर्ण केले.